IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# “अजिंठा लेणी एक आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ”

**डॉ. भालेराव ए.एस.**
सहयोगी प्राध्यापक
चिस्तिया कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, खुलताबाद
ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर

**दळवी हेंमत भुंजगराव**
संशोधक विद्यार्थी
भूगोलविभाग
डॉ. बा.आं.म.विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

**सारांश:**

महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) हा जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आहे. छत्रपती संभाजीनगर शहरापासून अवघ्या १०१ कि.मी. अंतरावर जागतिक वारसा लाभलेले 'अजिंठा पर्यटन स्थळ' असून, ही केंद्र सुमारे इ.स पूर्व दुसऱ्या ते इ.स.चौथ्या शतकातील आहे. या ठिकाणी 'बौद्ध' धर्माच्या लेण्या प्रामुख्याने दिसून येतात. 'अजिंठा लेणी' हे ठिकाण पर्यटकांचे आकर्षक असल्याने, येथे जगभरातून प्रतिदिन हजारो पर्यटक भेटी देतात. त्यामुळे या पर्यटन स्थळाचा सामाजिक आर्थिक प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो. 'अजिंठा लेणी' ही एक जागतिक पर्यटन स्थळ असून ते परकीय चलन प्राप्त करते आणि थेट रोजगाराद्वारे केंद्र राज्य आणि स्थानिक आर्थिकीकरणाला चालना देते. त्यामुळे त्यामुळे 'अजिंठा लेणी' हे पर्यटन स्थळ पर्यटन व पर्यटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण व संवेदनशील आहे. हे पर्यटन स्थळ पर्यटकांना विचार प्रवृत्त करायला भाग पाडते. तेथील शिल्प पर्यटकांच्या मनामध्ये स्वतःच्या अस्तित्वाची जागा निर्माण करते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंध 'अजिंठा लेणी' या आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळावर प्रकाश टाकतो.

**बीज संज्ञा:** पर्यटन स्थळ, अजिंठा, आकर्षण, पर्यटक, प्रभाव, रोजगार इत्यादी.

**प्रास्ताविक:**

पर्यटन हा एक मोठा उद्योगधंदा म्हणून विकसित होत आहे. जगभरात पर्यटन व्यवसाय अतिशय वेगाने वाढत असून सर्वात महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. पर्यटनाचा अर्थशास्त्र समाजशास्त्र विज्ञान व व्यवस्थापन याबरोबरच भौगोलिक घटक यांच्याशी जवळचा संबंध आहे. पर्यटनात पर्यटक प्रवास करतो, त्यातून सुख, मनोरंजन व विश्रांती या अपेक्षा करीत असतो. त्यामुळे भौगोलिक घटकाशिवाय पर्यटन परिपूर्ण होत नाही(१). (सांगळे शैलेजा 2019) भारतासारख्या विकसित देशाच्या व महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने पर्यटन उद्योगाला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पर्यटन स्थळामुळे स्थानिक लोकांना आणि इतर लोकांना उद्योग व रोजगारामध्ये वाढ होऊन त्यांच्या सामाजिक आर्थिक इत्यादी गोष्टीवर प्रभाव पडतो. त्यामुळे कोणत्याही पर्यटन स्थळांना दिवसेंदिवस महत्त्व वाढत आहे.

औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्ह्यातील 'अजिंठा लेणी' ही 'बौद्ध' धर्माच्या लेणी समूह हा भारतीय शिल्पकलेचा अद्वितीय नमुना आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील 'अजिंठा लेणी' ही जागतिक पातळीवर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. तत्पूर्वी याच जिल्ह्यात वेरूळ लेणी, औरंगाबाद लेणी, पितळखोरा लेणी, कोंढाणे लेणी व पांडवलेणी या सांस्कृतिक, धार्मिक व कलात्मक पर्यटन स्थळे देश- विदेशी पर्यटकांना आकर्षित करतात.

पर्यटनाने संपूर्ण जगाला आकर्षित केले आहे. त्यामुळे पर्यटनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. साधारणतः एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि हेतू साध्य झाल्यानंतर मूळ ठिकाणी परत येणे म्हणजे पर्यटन होय. किंवा इतर ठिकाणी पाहण्याच्या आणि अज्ञात क्षेत्राचा शोध घेण्याच्या मानवी गरजांमध्ये पर्यटनाच्या घटनेचे मूळ आहे.(२) महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने विविध पर्वतरांगा नयनरम्य समुद्रकिनारी गड किल्ले धबधबे प्राचीन लेणी धार्मिक तीर्थक्षेत्रे अभयारण्य अशी एक ना अनेक आकर्षक स्थळे असे पर्यटन समृद्ध राज्य आहे.(३) छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यास देखील स्वतःची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून जिल्ह्यातील अजिंठा ही ठिकाण युनोस्को (UNESCO) या जागतिक संघटनेने जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता देऊन त्यास 'जागतिक पर्यटन स्थळाचा' महत्त्वपूर्ण दर्जा दिला आहे.(४) त्यामुळे 'पर्यटन' हा जगातील सर्वात मोठा उद्योग म्हणून ओळखला जातो.(५)

भारतात पर्यटनाचा विकास अत्यंत गतीने होत आहे. कारण भारत देशाला समृद्ध असा सामाजिक सांस्कृतिक व भौगोलिक असा इतिहास आहे त्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांना प्राचीन किल्ले वास्तू लिहिण्यास धार्मिक मंदिरे व भौगोलिक विविधता आकर्षित करते त्यात महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्याला स्वतःची ऐतिहासिक पौराणिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्याची पर्यटन राजधानी म्हणून औरंगाबाद जिल्ह्याची विशेष ओळख आहे.

आज पर्यटन हे सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक क्षेत्रापैकी एक महत्वपूर्ण क्षेत्र आहे. तसेच व्यापार, रोजगार निर्मिती, गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक आर्थिक समावेश यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.(६)

**अभ्यास क्षेत्र:**

महाराष्ट्र राज्यात मराठवाडा विभागातील औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हा औद्योगिक व पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा जिल्हा आहे. 'अजिंठा लेणी' ही महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद शहराच्या उत्तरेस १०१ किमी अंतरावर औरंगाबाद-जळगाव मार्गावर स्थित असून लेणीचा बच्चा ७५° ४०' उत्तर अक्षांश ते २०° ३०' पूर्व रेखांश दरम्यान भौगोलिक स्थान आहे.(७) 'अजिंठा लेणी' ही दख्खनच्या पठारावरील ज्वालामुखी उद्रेकामुळे तयार झालेल्या 'बेसॉल्ट आणि ग्रॅनाईटच्या' खडकात कोरलेल्या आहेत ह्या लेणीचे क्षेत्रफळ साधारणपणे ७५ मीटर लांबीच्या खडकामध्ये अर्धगोलाकार कडा म्हणजेच घोड्याच्या नालाच्या आकारासारखी पसरलेली आहे. भव्य 'अजिंठा लेणी' ही 'युनोस्कोच्या' जागतिक वारसा यादीचा भाग आहे सण 1983 मध्ये या लेण्यांना जागतिक वारसा स्थळ (World Heritage site) म्हणून घोषित केले आहे. अजिंठा लेणी ही पूर्णपणे बौद्ध समूह लेणी आहेत.

**प्राकृतिक रचना:**

भूगोलाच्या दृष्टीने अजिंठा आणि त्याच्या सभोवतालचा परिसर हा दख्खनच्या पठारावरील सातमाळा व अजिंठा डोंगररांग प्रदेशात येतो. भूगर्भ शास्त्रज्ञांनी या बेसॉल्ट क्राफ्टला डेक्कन ट्रॅप असे संबोधले डेक्कन हा सामान्यतः दक्षिण भारताचा संदर्भ देणारा शब्द आहे आणि ट्रॅप खडकाच्या निर्मितीसारखा पायरीचा संदर्भ घेतो. निसर्गाने प्राचीन ज्वालामुखीय क्रियाकलापांच्या मार्गाने हा प्रदेश रॉक-कट आर्किटेक्चरसाठी तयार केला होता.(८)

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

१) अजिंठा लेणीचे स्थान व प्राकृतिक रचना अभ्यासणे.

२) अजिंठा लेणीचा सविस्तर अभ्यास करणे.

३) अजिंठा लेणी पर्यटन स्थळांना भेटी दिलेल्या पर्यटकांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम साधनावर अवलंबून असून त्या विषयाशी संबंधित पुस्तके, प्रकाशित शोध निबंध, मासिके, शासकीय अहवाल , जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन इत्यादी आणि भौगोलिक तंत्रज्ञानामध्ये नकाशे आलेख संकेत स्थळे व पर्यटन केंद्रातील संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय परिमाणांचा वापर केला आहे.

**विषय विमोचन:**

**अजिंठा लेणी पार्श्वभूमी :**

औरंगाबाद शहरापासून उत्तरेस १०८ कि.मी. अंतरावर आणि फर्दापुर या गावापासून दक्षिणेस सुमारे पाच कि.मी. वर सह्याद्री पर्वताच्या सातमाळा रांगेतील इंद्याद्री पर्वत श्रेणीजवळ वसला आहे. त्याच्या वायव्येस जो गुंफांचा समूह आहे, त्यास 'अजिंठ्याची लेणी' म्हणतात.(९) वाघुर नदीच्या काठावर ७५ मीटर उंच लांबीच्या बेसॉल्ट आणि ग्रॅनाईट खडकावर अर्धवर्तुकार कड्यामध्ये ह्या लेण्या कोरलेल्या आहेत. इ. स.पूर्व दुसऱ्या आणि पाचव्या शतकात या लेणीची निर्मिती करण्यात आली. अजिंठा लेण्या ह्या पूर्णपणे बौद्ध समूह लिहिणे आहेत. या लेण्यांच्या भिंतीवर बुद्धांच्या जीवनावरील दृश्य कोरलेली असून काही लिहिण्यात बुद्धांच्या विविध प्रसंगावरील रंगीत चित्र लिहिण्या आहेत. (१०) अजिंठा लेण्याची कोरीव कामे ही दोन कालखंडात करण्यात आली. त्यात प्रामुख्याने पहिला काळ ह... अजिंठा लेणी समूह ही केवळ एक अद्वितीय कलात्मक आणि तांत्रिक कार्य नाही तर ते प्राचीन भारतातील सामाजिक व सांस्कृतिक कौटुंबिक जीवन, दरबारातील विविध प्रसंगाची दृश्य, इ. जिवंत वाटणारी शिल्पकृती, रंगीत भिंतीचित्र आणि तेथील दगडावरील कोरीव काम हुबेहुब असल्याने देश विदेशातील व स्थानिक पर्यटकांना आकर्षक करतात. अजिंठा लेण्यातील चित्रकलेचे सूक्ष्म बारकावे आणि दगडावरील कोरीव शिल्पातील कौशल्य पर्यटकांना मोठ्या संख्येने आकर्षित करते.

**बौद्ध लेण्याची निर्मिती:**

जगप्रसिद्ध अजिंठा लिहिण्याची निर्मिती ही प्रामुख्याने दोन कालखंडात झालेली आहे.

**अ) पहिला टप्पा ( हीनयान काळ )**

हा कालखंड प्रामुख्याने सातवाहन राजवटीचा (इ.स. पूर्व दुसरे ते पहिले शतक) आहे. या काळात बौद्ध धर्माच्या 'हीनयान' पंथाशी संबंधित भिक्षणी येथे काही चैत्यगृह आणि साधे विहार तयार केले. या काळात बुद्धाची मूर्ती न दाखवता स्तूपाच्या माध्यमातून प्रतिकात्मक रूपाने पूजा अर्चा केली जात होती. तसेच या कालखंडात लेणी क्र. ८ ,९, १०,११,१२,१३,१५ अ यांची निर्मिती झाली.

**ब) दुसरा टप्पा (महायान काळ)**

हा कालखंड वाकाटक राजा हरीषेण ( इ. स.पुर्व ५ वे ते इ. स.६ वे शतक) यांच्या कालखंडात अनेक भव्यविहार चैत्यगृह सुंदर शिल्पकला तयार करण्यात आली या काळात बौद्ध धर्मातील 'महायान' पंथाचा प्रभाव वाढला आणि बौद्ध मूर्ती आणि भिंती चित्राची निर्मिती झाली.(१२)

**स्थापत्य प्रकार:**

अजिंठा येथील सर्व लेण्यांची निर्मिती प्रामुख्याने कठीण खडकामध्ये वरून -खाली अशा पद्धतीने कोरल्या असून त्यात प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात.

**अ) चैत्यगृह: (प्रार्थना कक्ष)**

अजिंठा लेण्या मधील चैत्यगृह विशेष उल्लेखनीय आहे त्या प्रार्थनागृहामध्ये प्रामुख्याने मोठे सभागृह अर्धगोलाकार शोध आणि शेवटी स्तूप अशी रचना दिसते या स्तंभांच्या रांगामुळे संपूर्ण सभागृहाला एक विशेष अशी भव्यता प्राप्त होते या स्तंभावर केलेले नक्षीकाम आणि शिल्पकला त्या काळातील कलाकारांच्या कौशल्य गुणांची साक्ष देतात. तसेच वास्तुकलेचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे तेथील आकर्षक अशी भिंतीचित्रे होय. या एकूणच भिंती चित्रांमध्ये बुद्धाच्या जीवनातील प्रसंग जातक कथा आणि त्या काळातील समाज जीवनाची चित्रण आढळते. या लेण्यांतील भिंत्ती चित्राचे खास वैशिष्ट्ये म्हणजे ही चित्रे नैसर्गिक रंगाचा वापर करून तयार केलेली ही चित्रे आजही जिवंत आणि आकर्षक वाटतात.

**ब) विहार: ( निवासस्थान )**

महायान काळात अजिंठा लेण्यांमध्ये बौद्ध भिक्षूंच्या वास्तव्यासाठी आणि ध्यान धरणा करण्यासाठी अनेक मोठ तयार करण्यात आले होते. या विहारांच्या रचनेत मध्यभागी एक मोठा हॉल, चारही बाजूने राहण्यासाठी लहान लहान खोल्या आणि मुख्य हॉलमध्ये बुद्ध मूर्ती किंवा स्तूप असणारा गर्भगृह असतो. या विहारांच्या रचना ह्या पूर्णपणे आयाताकृती आहेत. या विहारांच्या खांबावर कोरीव काम व नक्षीकाम केलेली आहे तसेच विहाराचे प्रवेशद्वारावर आणि दर्शनी भागावर सुंदर शिल्पकलेचे कोरीव व नक्षीकाम आहे.(१३)

**अजिंठा लेणी पर्यटन स्थळ पर्यटकांचे आकर्षण:**

अजिंठा येथील लेण्या ह्या श्रेष्ठ दर्जाचे कलाकेंद्र म्हणून जगप्रसिद्ध आहेत. अजिंठा लेण्या ह्या बौद्ध समूह लेण्या असल्याने या पर्यटन स्थळाला पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. अद्वितीय शिल्पकलेचे दर्शन अजिंठा लेण्यात होते. या लेण्यातील चैत्यगृह व विहारातील कोरीव काम आणि नक्षीकाम हे पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. एवढेच नाही तर स्तंभावर केलेली नक्षीकाम, शिल्पकला आणि नैसर्गिक रंगाने काढलेली चित्रे पर्यटकांना जिवंत अनुभूती देतात. त्यामुळे केवळ भारतीयच नव्हे तर जगातील कलारसिक व पर्यटक अजिंठा यात्रा करतात. अशाप्रकारे अजिंठा लेण्यातील चैत्यगृह, विहार, प्रवेशद्वार व दर्शनी भागावर केलेली सुंदर शिल्पकला व कोरीव नक्षीकाम, बौद्ध मूर्ती तेथील शिल्पकला रंगीत भिंतीचित्रे आणि कला स्थापत्य उत्कृष्ट असल्याने ते पाहण्यासाठी डिश विदेशातून पर्यटक येतात म्हणून हे पर्यटन स्थळ आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे आहे.

### अंजिठा लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेले पर्यटक:-


अंजिठा लेणी पर्यटक स्थळाला सन 2013-2014 ते 2022-2023 या कालखंडात देश-विदेशी पर्यटकांनीदि लेली भेटीची संख्या पुढील तक्तात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र.1**
**अंजिठा लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेले पर्यटक**

| अ.क्र. | वर्ष | भारतीय पर्यटक | विदेशी पर्यटक |
|---|---|---|---|
| 1 | 2013-14 | 308327 | 15223 |
| 2 | 2014-15 | 311223 | 311223 |
| 3 | 2015-16 | 380971 | 94631 |
| 4 | 2016-17 | 468321 | 17200 |
| 5 | 2017-18 | 496600 | 15323 |
| 6 | 2018-19 | 498970 | 15721 |
| 7 | 2019-20 | 273344 | 15898 |
| 8 | 2020-21 | 040187 | 0055 |
| 9 | 2021-22 | 114917 | 0409 |
| 10 | 2022-23 | 393928 | 3937 |

**स्त्रोत: 1**) महाराष्ट्र पुरातत्व अहवाल-2018
2) दैनिक लोकमत 24 ऑगस्ट 2023 (2019-20 ते 2022-23)

**आलेख क्र.01**




### भारतीय पर्यटक :-

वरील तक्ता व आलेखानुसार अजिंठा पर्यटन स्थळाला सन २०१३-१४ मध्ये ३०४३२१ भारतीय पर्यटकांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यानंतर २०१४-१५ या वर्षात ३११२०३ पर्यटकांनी भेटी दिल्या. २०१५-१६ या वर्षात ३४०१३१ पर्यटक, तर वर्ष २०१६-१७ मध्ये ४६४३२५ पर्यटकांनी भेटी दिलेल्या नोंदी असल्याचे दिसते. त्यानंतर २०१७-१८ मध्ये ४१६६०० पर्यटक भेटी देणार तर २०१८-१९ मध्ये ५१९१३० पर्यटक भेटी दिल्याची नोंद आहे. तसेच

२०१९-२० मध्ये या वर्षात २१३३५४ पर्यटकांनी भेटी दिलेल्या आहेत. तर २०२०-२१ या वर्षात ४०१८७ पर्यटकांनी भेटी दिल्याची नोंद आहे. त्यानंतर २०२१-२२ मध्ये ११४९१७ पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत तर २०२२-२३ या वर्षात ३९३१२४ भारतीय पर्यटकांनी अजिंठा लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेल्या आहेत.

**विदेशी पर्यटक** :-

वरील तक्ता व आलेखावरून असे निदर्शनास येते की, अजिंठा पर्यटन स्थळाला सन २०१३-१४ ते २०२२-२३ या कालखंडात सन २०१६-१७ या वर्षात सर्वात अधिक १७२०० विदेशी पर्यटकांनी भेटी दिलेले दिसते. तर सन २०१४-१५, २०१५-१६ आणि २०१७-१८ या वर्षात अनुक्रमे १५९१४, १५७२५ आणि १५००३ पर्यटकांनी प्रत्यक्ष भेटी दिलेल्या आहेत. त्यानंतर सन २०१८-१९ मध्ये या वर्षात १४६६१ विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्याची नोंद आहे. तसेच २०२२-२३ या वर्षात ३१७५ पर्यटक भेटी दिलेल्या आहेत. तर सन २०२०-२१ या वर्षात सर्वात कमी विदेशी पर्यटकांनी अजिंठा लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिल्याची नोंद झालेली आहे.

अर्थात, अजिंठा लेणी पर्यटन स्थळाला सन २०१३-१४ ते २०२२-२३ या वर्षात भारतीय पर्यटकांनी विदेशी पर्यटकांच्या तुलनेने अधिक भेटी दिलेल्या असल्याचे निदर्शनास येते परंतु सन सन २०२०-२१ ते २०२२-२३ या वर्षात भारतीय व विदेशी पर्यटकांच्या अजिंठा लेणी भेटीत घट झाल्याचे दिसते. त्याची जागतिक पातळीवर नैसर्गिक असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**:-

1. अजिंठा लेणी इत्यादी पर्वतराजीजवळ अजिंठा डोंगरात कोरल्याने प्राकृतिक दृष्टीने लेणीला विशेष महत्त्व होत असल्याचे दिसते.
2. अजिंठा लेणी ह्या इ.स.पूर्व पहिल्या ते इ.स.पूर्व सहाव्या शतकात खोदण्यात आलेल्या आहेत.
3. अजिंठा लेण्या ह्या बौद्ध धर्म समुहाच्याच असल्याचे दिसते.
4. अजिंठा लेण्यांची निर्मितीच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे हीनयान कालीन चैत्यगृह आणि साधी विहारे तयार करण्यास प्राधान्य दिलेले आहे.
5. हीनयान काळात बुद्धाची मुर्ती न दाखवता स्तुपाच्या माध्यमातून प्रतीकात्मक रूपाने पुजा अर्चा केली जात होती.
6. महायान काळात (वाकाटक घराणे) (इ.स.पूर्व २ ते इ.स.पूर्व ६ वे शतक) अनेक भव्यविहार, चैत्यगृह, बौद्ध मुर्ती आणि भित्तीचित्रांची निर्मिती झाली.
7. अजिंठा लेणीतील चैत्यगृह आणि विहारातील स्तंभावर केलेले नक्षीकाम आणि शिल्पकला त्या काळातील कलाकारांच्या कौशल्य गुणांची साक्ष देतात.
8. अजिंठा लेणीतील भित्तीचित्रांमध्ये बुद्धाच्या जीवनातील विविध प्रसंग, जातक कथा आणि तत्कालीन समाजजीवनाचे उत्कृष्ट चित्रण आढळते. नैसर्गिक रंगांचा वापर करून तयार केलेली ही भित्तीचित्रे आजही जीवंत वाटतात आणि पर्यटकांना आकर्षित करतात.
9. सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात विदेशी पर्यटकांच्या तुलनेमध्ये भारतीय पर्यटकांनी मोठ्या संख्येने लेणीस भेटी दिल्याचे आढळून येते. मात्र, वर्ष २०२०-२१ मध्ये जागतिक नैसर्गिक आपत्तीमुळे (कोरोना महामारीमुळे) ही संख्या कमालीची घटली आणि केवळ ४०,१८७ भारतीय पर्यटकांनी भेट दिली.
10. सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वाधिक १७,२०० विदेशी पर्यटकांनी अजिंठा लेणीस भेटी दिल्या, तर जागतिक नैसर्गिक आपत्तीच्या काळात (वर्ष २०२०-२१) ही संख्या सर्वात कमी म्हणजे केवळ ५५ इतकी नोंदवली गेली.
11. अजिंठा लेणी पर्यटन स्थळाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या विविध सुख-सुविधांमुळे दरवर्षी देश-विदेशातील पर्यटकांच्या संख्येत उत्तम वाढ होत असल्याचे दिसून येते.
12. देश-विदेशातील पर्यटकांनी अजिंठा पर्यटन स्थळाला दिलेल्या भेटींतून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते, तसेच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होण्यास मोठी मदत होते.
13. सांगळे शैलजा (२०१९) भूगोल पर्यटन, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

14. Qurahan Akdag & zafar Other ,(2011), assessment of word tourism from a geographical prespective and a comparative views of leading destination in the market, procedia Social and Behavioral science,p_217.
15. महाराष्ट्र शासन (२०११), लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय मुंबई , पृ क्र. 12.
16. महाराष्ट्र शासन ( २०२२), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा औरंगाबाद, जिल्हा सांख्यिकी कार्यालय औरंगाबाद पृ.०९
17. Ranjeet Taneja (2008), travel geography, Alpha publication, New Delhi, P.195.
18. भारत सरकार (२०२३), अव संरचना और स्वच्छता की क्षेत्र में पर्यटन स्थलो का मूल्यांकन (पर्यटन मंत्रालय द्वारा) पृ. ९
19. whc. unesco.org
20. ccrtindia gov.in
21. देशपांडे सु.र.(२०१८), भारतीय वैभवशिल्प: प्राचीन - मध्ययुगीन, मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे.
22. whc. unesco.org
23. महाराष्ट्र शासन (२०१८), महाराष्ट्र पुरातत्व विभाग अहवाल.
24. दैनिक लोकमत २८ ऑगस्ट २०२३.